लोकमत

समर्थ पॉलिटेक्निकच्या प्रयोगाला प्रथम क्रमांक

# ‘प्रयोग करू, आनंद घेऊ’ ऑनलाइन विज्ञान स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोडद :** राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने डॉ. सी. व्ही. रमन यांना अभिवादन करण्यासाठी जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघाच्या वतीने ‘प्रयोग करू, आनंद घेऊ’ या स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत लहान गटात आदिती महेंद्र देशपांडे व शुभम महेंद्र देशपांडे, प्राचार्य सबनीस प्राथमिक शाळा, जुन्नर यांनी सादर केलेल्या हवेतील ऑक्सिजन पातळी या प्रयोगाला तसेच मोठ्या गटात बेल्हे येथील समर्थ पॉलिटेक्निक विद्यार्थी गणेश मोढवे, प्रमोद पवार, अक्षय बगाटे व आकाश सांडभोर यांनी सादर केलेल्या हेल्मेटमधील कूलिंग सिस्टिम या प्रयोगाला प्रथम क्रमांक मिळाल्याची माहिती जुन्नर तालुका विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. रतिलाल बाबेल व गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण ताजणे यांनी दिली.




बक्षीस वितरणप्रसंगी उपस्थित असलेले रतिलाल बाबेल, प्रवीण ताजणे, वल्लभ शेळके.

## स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

लहान गट : प्रथम क्रमांक : आदिती देशपांडे व शुभम महेंद्र देशपांडे (प्राचार्य सबनीस प्राथमिक विद्यामंदिर,जुन्नर ), द्वितीय क्रमांक: क्षितिजा जनार्दन पटाडे (व्ही. जे. इंटरनॅशनल स्कूल), तृतीय क्रमांक: आर्या सुहास जाधव (जे. एस. पी. एम., स्कूल, पुणे)

मोठा गट : प्रथम क्रमांक : गणेश मोडवे, प्रमोद पवार, अक्षय बगाटे, आकाश सांडभोर कॉलेज : समर्थ पॉलिटेक्निक बेल्हे प्रकल्प: हेल्मेटमधील कूलिंग सिस्टिम. द्वितीय क्रमांक : कनक वाळुंज, आदिती निकम, अंजली कडाळे, आकाश खंडागळे. कॉलेज: समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे. प्रकल्प: दही घुसळण्याची वैदिक पद्धत. तृतीय क्रमांक: अक्षित येंधे, ओंकार भवारी, प्रदीप शेळके. कॉलेज: समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे. प्रकल्प: किड्स लर्निंग ॲप्लिकेशन.

यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र, वैज्ञानिक पुस्तक घरपोच भेट देण्यात येत आहे. बक्षीस वितरण समारंभप्रसंगी, प्रा. रतिलाल बाबेल, प्रवीण ताजणे, व्यंकट मुंढे, समर्थ शैक्षणिक संकुलाचे सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, पॉलिटेक्निकचे प्राचार्य कपिले, प्रा संजय कंधारे, विभाग प्रमुख प्रा महेंद्र खटाटे, प्रा. महेश पोखरकर प्रा. प्रदीप गाडेकर उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 4 Mar 18, 2021
Powered by: erelego.com

# आदिती-शुभमसह समर्थ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे यश

### विज्ञान दिनानिमित्त स्पर्धेत विविध प्रयोग केले सादर

**बेल्हे, दि. १७ (वार्ताहर)** - राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने डॉ. सी. व्ही. रामन यांना अभिवादन करण्यासाठी जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघाच्या वतीने प्रयोग करू -आनंद घेऊ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत लहान गटात आदिती महेंद्र देशपांडे व शुभम महेंद्र देशपांडे, प्राचार्य सबनीस प्राथमिक शाळा, जुन्नर यांनी सादर केलेल्या हवेतील ऑक्सिजन पातळी या प्रयोगाला तसेच मोठ्या गटात समर्थ पोलिटेकन्कि, बेल्हेचे विद्यार्थी गणेश मोढवे, प्रमोद पवार, अक्षय बगाटे व आकाश सांडभोर यांनी सादर केलेल्या हेल्मेट मधील कुलिंग सिस्टिम या प्रयोगाला प्रथम क्रमांक मिळाला.



**बेल्हे (ता. जुन्नर) : 'प्रयोग करू आनंद घेऊ' स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना मान्यवर व विद्यार्थी.**

प्रा. रतीलाल बाबेल म्हणाले, करोनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय विज्ञान दिनाला विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शनांना भेटी देता आल्या नाही. विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लावण्यासाठी घरच्या घरी छोटे प्रयोग करण्याची संधी जुन्नर तालुका विज्ञान व गणित संघाने उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांमधील कुतूहल व जिज्ञासा जागृत ठेवण्याचे काम जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघ गेली अनेक वर्ष उत्तम रीतीने करीत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र, वैज्ञानिक पुस्तक घरपोच भेट देण्यात येत आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना समर्थ कॉलेज येथे बक्षीस वितरित करण्यात आले.

### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

लहान गट: प्रथम : आदिती देशपांडे व शुभम महेंद्र देशपांडे. (प्राचार्य सबनीस प्राथमिक विद्यामंदिर जुन्नर), द्वितीय : क्षितिजा जनार्दन पटाडे (व्ही. जे. इंटरनॅशनल स्कूल), तृतीय : आर्या सुहास जाधव (जेएसपीएम स्कूल पुणे) मोठा गट : प्रथम- गणेश मोडवे, प्रमोद पवार, अक्षय बगाटे, आकाश सांडभोर (समर्थ पॉलिटेक्निक बेल्हे -प्रकल्प : हेल्मेट मधील कुलिंग सिस्टिम), द्वितीय : कनक वाळुंज, आदिती निकम, अंजली कडाळे, आकाश खंडागळे. (समर्थ पॉलिटेक्निक बेल्हे - प्रकल्प दही घुसळण्याची वैदिक पद्धत), तृतीय : अक्षित येंधे, ओंकार भवारी, प्रदीप शेळके. (समर्थ पॉलिटेक्निक बेल्हे - प्रकल्प : किड्स लर्निंग ॲप्लिकेशन)

प्रभात Thu, 18 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59157588